नि.फौ.ख.क्रं.५८/२०१८
शासन वि काशिनाथ
नि.क्रं. ९३

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं. ६ यांची शपथेवर जबानी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | धनु दिलीप तवले, |
| वय | : | ३० वर्षे |
| व्यवसाय | : | मजुरी |
| राहणार | : | रा.तवलवाडी, ता. आष्टी जि. बीड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत**

१. मला पंचनाम्यासाठी रस्तयाने जात असताना शेख साहेबांनी थांबवले. त्यांनी पंचनाम्यावर माझी सही घेतली. मी कामाच्या गडबडीत होतो. पंचनाम्यात काय नमुद केले हे मला माहित नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने अभियोग पक्षाने साक्षीदारास उलटतपाससदृश प्रश्न विचाराण्याची तोंडी परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली –**

२. हे म्हणणे खरे आहे की, मला शेख साहेबांनी घटनास्थळाचा पंचनामा करायचा आहे पंच म्हणुन काम करणार का असे विचारले त्यास मी होकार दिला. हे म्हणणे खरे आहे की, दुसरे पंच रविंद्र केरुळकर हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ फिर्यादीने दाखवले. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ तवलवाडी आष्टी जाणाऱ्या कच्या रोडवर दक्षिण पंख्यावर होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ मनोहर तवले यांचे शेताजवळ आहे. घटनास्थळाच्या पूर्व पश्चिमेला मनोहर तवले यांची शेती असल्याबाबत सांगता येत नाही. उत्तर दक्षिणेला तवलवाडी ते आष्टी कडे जाणारा कच्चा रोड असल्याबाबत सांगता येत नाही. दि. १३/१०/२०१७ रोजी पंचनामा सकाळी ९.२० ते ९.५० दरम्यान केल्याचे आठवत नाही. साक्षीदारास पंचनामा दाखवला त्यावर अ. क्र. २ वर माझी सही आहे. **सहीस नि. ९४** देण्यात येते. सही कोठे घेतली हे सांगता येत नाही. पंचनाम्यातील मजकुरा बाबत सांगता येत नाही. माझे शिक्षण ९ वी पर्यंत झालेले आहे. मला सहीचे महत्व कळते. सही घेतल्याबाबत मी कोठेही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी, फिर्यादी व आरोपी तवलवाडीला राहतो त्यामुळे आरोपी व फिर्यादीस ओळखतो. अमान्य की, आरोपीस वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. आर.आर. हंबर्डे यांचे मार्फेत उलटतपास**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी साक्ष देण्यास इच्छुक नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की,

शेख साहेबांसोबत माझी पुर्वीची ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी फिर्यादी व राहुल सोबत बालपणापासुन मैत्री आहे. अमान्य की, मी राहुलच्या तेजस धाब्यावर अधुनमधुन जात असतो. मला साक्ष बाबत समंस मिळाले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व राहुलच्या सांगण्यावरुन मी साक्षकामी आलो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी कशाचा पंचनामा आहे याबाबत समजावुन व वाचुन सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी फिर्यादी, राहुल व पोलीस एका कोपऱ्यात चर्चा करत होते. हे म्हणणे खरे आहे की, राहुल व तपासी अधिकारी यांची ओळख आहे.

४. घटनास्थळाच्या खातेदाराचे नावे सांगता येणार नाहीत. माझे बऱ्याच वेळा न्यायालयात येणे जाणे असते. घटनेच्या काळात फिर्यादी व साक्षीदार झुंबर मोटारसायकलवरुन पडल्याबाबत चर्चा होती किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी दोन्ही बाजुने ८ ते १० फुटाच्या खदानी/ खड्डे खांदलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कानावर मारामाऱ्या झाल्याचे पडले नाही. तसेच घटनेच्या वेळी त्याबाबत गावामधे देखील चर्चा नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी रस्तयाचे काम चालु असल्याने सारखे अपघात होत. हे म्हणणे खरे आहे की, मी रस्त्याने जात असताना माझी पंचनाम्यावर सही घेतली मला पंचनामा समजावुन, वाचनु दाखवला नाही. पंच रवि केरुळकर तेजस धाब्याच्या मागे राहण्यास आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी घटनास्थळ तवलवाडी रस्त्यावर दक्षिण पंख्यावर असल्याचे सांगीतले नव्हते. अमान्य की, अभिषेक ने घटनास्थळ दाखवल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक ः २१/०४/२०२६

स्थळ ः आष्टी

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.04.21 17:29:22 +0530

(एम.आर.बडाख)
३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आष्टी.